## सत्र ५ : घटक ३

# मॅकियाव्हेली

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ मॅकियाव्हेलीचे मनुष्य स्वभावासंबंधी विचार
- ३.२.२ राजकारणाची धर्म व नैतिकतेपासून फारकत
- ३.२.३ मॅकियाव्हेलीचे शासनाचे वर्गिकरण
- ३.२.४ मॅकियाव्हेलीने राजाला केलेला उपदेश
- ३.२.५ मॅकियाव्हेली : आधुनिक राजकीय विचारांचा जनक

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

३.४ स्वंय-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## ३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास-

- मॅकियाव्हेलीच्या मनुष्य स्वभावासंबंधीच्या विचारांचे आकलन होईल.
- राजकारणाची - धर्म व नैतिकतेपासून फारकत करणे गरजेचे का होते? हे समजेल.
- राजाने राज्यसंस्था टिकविण्यासाठी कसे वर्तन करावे? हे स्पष्ट होईल.
- मॅकियाव्हेलीला आधुनिक राजकीय विचारांचा जनक का म्हणतात, हे स्पष्ट करता येईल.

## ३.१ प्रास्ताविक

ग्रीक व रोमन काळात धर्मसत्ता व राज्यसत्ता ह्या वेगवेगळ्या होत्या. त्यामुळे राज्याचे स्वरूप धर्मनिरपेक्ष राहिले. पण रोमन सम्राटाने ख्रिश्चन धर्माचा स्विकार केल्यानंतर तो राजधर्म बनला व धर्मसत्तेचे वर्चस्व वाढू लागले. राजकारणात हस्तक्षेप करीत चर्चने सत्ता आपल्या हातात घेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे चर्च आणि राज्य यांच्यात सत्तेसाठी संघर्ष सुरू झाला.

या सुमारास काही विचारवंतानी जनतेत बौद्धिक जागृती करण्याचा प्रयत्न केला. पोपच्या अनियंत्रीत सत्तेला विरोध करण्यासाठी लोकांच्या बौद्धिकतेला आव्हान देण्यात येऊ लागले. मध्ययुगाचा शेवट हा धर्मसुधारणा व पुनरुज्जीवनाच्या आंदोलनाने झाला. याच काळाचा मॅकियाव्हेली प्रतिनिधी असून त्याचा इहलोकाचा विचार, बुद्धिप्रामाण्य व तर्काचा वापर यामुळे इतर मध्ययुगीन विचारवंतापेक्षा मॅकियाव्हेली वेगळा मानला जातो. त्याचे राजकीय विचारात एक वेगळे स्थान निश्चित होते.

## ३.२ विषय विवेचन

■ **जीवन-परिचय**

निकोलो मॅकियाव्हेलीचा जन्म इटलीतील फ्लॉरेन्स या ठिकाणी सामान्य कुटूंबात १४६९ मध्ये झाला. त्याचे वडील व्यवसायाने वकील होते तरी परिस्थिती सामान्य असल्याने त्याला उच्च शिक्षण घेता आले नाही. खूप प्रयत्नांनी १४९० मध्ये त्याला सामान्य प्रशासकीय पदावर नोकरी मिळाली. पुढे वयाच्या २९ व्या वर्षी फ्लॉरेन्स शहरराज्याच्या प्रशासन विभागात त्याला सचिवाची नोकरी मिळाली. येथे अंतर्गत व्यवहार व युद्धकार्ये यासाठी असलेल्या युद्धमंडळाचा तो चौदा वर्षे चिटणीस होता. या चिटणीस पदावर असताना राजदूत या नात्याने रोम, पॅरिस, बर्लिन इ. राज्यांना भेटी दिल्या. परदेश प्रवासात फ्रान्स, स्वित्झर्लंड, जर्मनी इ. राज्यव्यवस्थाचा अभ्यास केला. स्वित्झर्लंडची संघराज्य व्यवस्था इटलीत निर्माण व्हावी. तसेच फ्रान्स, स्पेन प्रमाणे संघटित होऊन इटलीने सामर्थ्यशाली बनावे असे मॅकियाव्हेलीला वाटत होते.

पण पोप दुसरा ज्युलियस याने स्पेन व व्हेनिस यांच्याशी मैत्री करून १५१२ प्लॉरेन्स नगरराज्यावर आक्रमण करून तेथील राज्यसत्ता नष्ट केली. पुढे मेडिची घराण्याची सत्ता आली. या घराण्याची सत्ता घराण्याविरूद्धच्या कटात सामील असल्याचा आरोप मॅकियाव्हेलीवर ठेवून एक वर्षाची कारावासाची शिक्षा दिली. पण तो निर्दोष आढळल्याने त्याला सोडून देण्यात आले. पुढील आयुष्याची १५ वर्षे फ्लॉरेन्सजवळील एका खेड्यात मॅकियाव्हेलीने घालवली. याच काळात मॅकियाव्हेलीने ग्रंथलेखन केले पुढे २० जून १५२७ रोजी मॅकियाव्हेलीचे निधन झाले.

■ **ग्रंथरचना**

इटलीची चाललेली अधोगती, दारिद्र्य, अशांतता हे दोष नाहीसे करणे. यासाठी इटलीचे ऐक्य घडवून एक स्वतंत्र राष्ट्रीय राज्य निर्माण करण्याच्या हेतूने मॅकियाव्हेलीने आपली ग्रंथरचना केली. त्याच्यासमोर १) इटलीच्या राष्ट्रीय राज्याची निर्मिती २) इटलीच्या नगरराज्यांना समृद्ध करण्यासाठीची उपाययोजना ३) ज्ञानाच्या पुनरूज्जीवनाच्या चळवळीला सहकार्य आणि ४) अंधविश्वासातून इटालीयन समाजाची मुक्तता या समस्या होत्या.

या समस्यांचा विचार करून मॅकियाव्हेलीने

१) The Prince (दि प्रिन्स)

२) Discourses on the first decade of Titas Livious या ग्रंथालाच Discourses of Livy (डि स्कोर्सेस ऑफ लिव्ही)

३) Art of War (आर्ट ऑफ वॉर)

४) History of Florence (हिस्ट्री ऑफ फ्लॉरेन्स)

या महत्वाच्या ग्रंथाची निर्मिती करून व्यावहारिक दृष्टीकोनातून मॅकियाव्हेलीने आपले विचार मांडले.

■ **मॅकियाव्हेलीची अध्ययनपद्धती**

मॅकियाव्हेलीने वापरलेल्या अध्ययनपद्धतीचे विश्लेषण केल्यास, त्याने ऐतिहासिक, तुलनात्मक निरीक्षणात्मक, वास्तववादी व शास्त्रीय पद्धतीचा वापर करून आपले विचार मांडले. मॅकियाव्हेली पारंपरिक विवेचनातून मुक्त होऊन, स्वतंत्र बुद्धीने विवेचन करणारा वास्तववादी विचारवंत होता. जे प्रत्यक्ष अनुभवता येते, जे दिसते अशाच आधारांवर निष्कर्ष काढण्याची पद्धत त्याने वापरली. मॅकियाव्हेलीने स्वतःच्या अनुभवाच्या आधारावर आपली विशिष्ट मते बनविली व त्यांच्या समर्थनासाठी इतिहासातील दाखले दिले. त्याबरोबरच निरिक्षणाचा वापर करून तत्कालीन राज्यव्यवस्थेतील दोष स्पष्ट केले. त्यातून मनुष्य स्वभावतःच स्वार्थी असतो अशा निष्कर्षापर्यंत तो पोहचला. अशा शास्त्रीय दृष्टीकोनातूनच त्याने वाढलेल्या अवास्तव चर्चच्या सत्तेला विरोध केला. धर्म ही व्यक्तीगत बाब असून, धर्माने राज्याच्या कार्क्षेत्रात हस्तक्षेप करू नये असे त्याने स्पष्ट केले.

★ **स्वयं अध्ययन प्रश्न–१**

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

१. मॅकियाव्हेलीचा जन्म कोणत्या ठिकाणी व किती साली झाला?

२. मॅकियाव्हेलीच्या दोन ग्रंथांची नावे लिहा.

३. मॅकियाव्हेलीने अध्ययनासाठी कोणत्या पद्धतींचा वापर केला?

४. मॅकियाव्हेलीचे निधन कधी झाले?

## ३.२.१ मॅकियाव्हेलीचे मनुष्यस्वभावासंबंधीचे विचार

आपल्या 'दि प्रिन्स' या ग्रंथात मॅकियाव्हेलीने मनुष्यस्वभावाचे विवेचन केले आहे. मनुष्य हा निसर्गतःच स्वार्थी व दुष्ट प्रवृत्तीचा असतो. स्वार्थच त्याला कार्य करण्यासाठी प्रेरित करीत असतो. याबरोबरच मनुष्य कृतघ्न, भित्रा, चंचल व विश्वासघातकी असतो. त्यामुळे मानवास त्याच्या इच्छेप्रमाणे कार्य करण्याची मुभा दिली तर, त्याच्याकडून वाईट कृत्येच अधिक होतील. त्यामुळे मानवी वर्तनावर नियंत्रण ठेवणे आवश्यक बनते. प्रत्येक मनुष्यात स्वार्थ लपलेला असतो असे मॅकियाव्हेली म्हणतो. प्रजेच्या ठिकाणी संपत्ती व स्त्रीचा स्वार्थ असतो. व या गोष्टी मिळविण्यासाठी मनुष्याचे लोभी मन कोणतेही वाईट कृत्य करण्यास तयार असते. यातून स्पर्धा व संघर्ष निर्माण होतात आणि बुद्धिचा विसर पडतो व मानवी वर्तन पशूप्रमाणे बनते असे मॅकियाव्हेलीचे म्हणणे आहे. मानवाच्या ठिकाणी प्रेम, सहकार्य हे गुण आढळत असले तरी, ते सर्व स्वतःच्या स्वार्थाकरीता असतात, ज्या गोष्टीतून आपल्याला फायदा होईल अशा गोष्टींबाबत मानव अधिक प्रेम दाखवतो किंवा त्याबाबत चांगले वर्तन करतो. मॅकियाव्हेलीच्या मते, मनुष्य आपल्या जन्मदात्या पित्याची

हत्या विसरेल, पण आपल्या संपत्तीतील आपला वाटा विसरणार नाही. अशा ढोंगी वृत्तीच्या मनुष्याकडून सहज चांगल्या वर्तनाची अपेक्षा न करणे हेच चांगले होय.

मॅकियाव्हेलीच्या मते, मनुष्य ज्याप्रमाणे स्वार्थी, दुष्ट आहे, त्याप्रमाणेच तो भित्रा व दुबळा ही आहे. त्यामुळे मनुष्यास आपल्या जीविताची व संपत्तीची खात्री वाटत नाही. साहजिकच जीविताचे व संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी त्याला राज्यसंस्थेची गरज भासते. या गरजेतूनच राज्यसंस्थेची निर्मिती होते व तिचा प्रमुख या नात्याने राजा निर्माण होतो. या राज्यसंस्थेने मनुष्याची संपत्ती व जीवन यांचे संरक्षण चांगल्याप्रकारे केल्यास तिला स्थैर्य प्राप्त होते. पण स्वार्थी व दुष्ट मनुष्यावर कायद्याने नियंत्रण निर्माण करण्याबरोबरच, त्याला अराजकतेची भीतीही दाखवावी अशा अराजकतेच्या भीतीतून शासनास आपोआपच स्थैर्य प्राप्त होत असते. स्वार्थ, लोभ, प्रेम यातून निर्माण होणारे स्नेहसंबंध हे कालसापेक्ष व पोकळ असतात. असे स्नेहसंबंध स्वार्थाच्यावेळी नष्ट करण्यास मनुष्यास काहीही वाटत नाही. पण ज्याविषयी दरारा व भीती असते. अशा राज्यसंस्थेस दगा देण्यास मनुष्य घाबरतो. कारण राज्यसंस्थेच्या दंडशक्तीचा धाक किंवा भीती त्याच्यासमोर असते. म्हणून राजाने स्वार्थी, दुष्ट व लोभी प्रजेवर दंडशक्तीच्या भीतीनेच राज्य करावे असे मॅकियाव्हेलीला वाटत होते. राजाच्या आज्ञा मोडणाऱ्यांना कडक शासन करावे, तसेच राजाने शक्तीशाली बनून प्रजेला संरक्षण ही द्यावे. समाजात अनेक स्वभावाची माणसे असल्याने त्यांच्याशी राज्याने धूर्तपणे कायदा व दंडशक्ती यांचा वापर करावा. काही वेळेस मनुष्यास भीती दाखवून, त्याला फसवून त्याच्याकडून चांगले काम करून घ्यावे. त्याची स्वार्थी वृत्ती दाबण्यासाठी राजाने दंडशक्तीचा उपयोग करावा.

**मॅकियाव्हेलीच्या मनुष्यस्वभाव विषयक विचारांची वैशिष्ट्ये**

१) मनुष्यस्वभाव स्वार्थी, दुष्ट, कपटी, भित्रा व दुबळा आहे.

२) मनुष्य स्वतः जीविताच्या आणि संपत्तीच्या सुरक्षिततेसाठीच धडपडतो व त्यातूनच राज्यसंस्थेचे नियंत्रण स्वीकारतो.

३) राजाने आपले धोरण ठरविताना मनुष्यस्वभाव लक्षात घेऊन प्रेमापेक्षा भीतीनेच आपले कार्य साध्य करावे.

४) दंडशक्तीचा वापर करून राजाने प्रजेच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण करावे व राज्यकारभार चालवावा.

५) मनुष्यातील दुर्गुणांना दंडशक्तीच नियंत्रणात आणू शकते.

**मॅकियाव्हेलीच्या मनुष्यस्वभाव विषयक विचारांवरील आक्षेप**

१) मॅकियाव्हेलीने केलेले मनुष्यस्वभावाचे विवेचन एकांगी असून, ते केवळ त्या वेळच्या इटलीतील मनुष्याच्या वर्तनावर आधारित आहे.

२) मनुष्यस्वभावातील दुर्गुणांकडे लक्ष देणारा मॅकियाव्हेली, मनुष्यातील देशहित व परस्पर सहकार्याच्या गुणांकडे दुर्लक्ष करतो.

३) मनुष्यात चांगले व वाईट असे दोन्ही गुण असतात, याबाबत मॅकियाव्हेली भाष्य करत नाही.

४) परिस्थितीनुसार मनुष्यातील चांगले किंवा वाईट गुण प्रदर्शित होत असतात, याकडे तो दुर्लक्ष करतो.

५) मॅकियाव्हेलीने केलेल्या मनुष्यस्वाभावाच्या विश्लेषणाला कोणताही शास्त्रीय आधार नाही.

अशा रितीने मॅकियाव्हेलीने मनुष्यस्वभावाचे केलेले विवेचन निराशावादी वाटते. पण वेगवेगळया विचारवंतांनी या विषयासंबंधीची मांडणी आप-आपल्या विषयाला अनुसरून केलेली दिसून येते. मॅकियाव्हेलीने सुद्धा निरंकुश व अमर्याद राज्यसत्तेच्या निर्मितीसाठी, मनुष्याला स्वार्थी, दुष्ट ठरवून विचारांची मांडणी केलेली पहावयास मिळते.

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

१) मॅकियाव्हेतीच्यामते मनुष्य निसर्गतः कशा प्रवृत्तीचा असतो?

२) मनुष्याला सर्वात जास्त भीती कशाची वाटते?

३) राजाने प्रजेवर कसे राज्य करावे?

## ३.२.२ राजकारणाची धर्म आणि नैतिकतेपासून फारकत

मॅकियाव्हेलीला त्यांने मांडलेल्या नैतिकते संबंधीच्या विचारांनीच त्याला मध्ययुगातील विचारवंतांपासून वेगळे करून वर्तमान विचारवंतांच्या पंक्तीत आणून बसवले आहे. तो आपले विचार तर्कशुद्ध व शास्त्रीय आधारावर मांडत असताना धर्माला व नीति-अनीतीच्या कल्पनांना महत्व देत नाही.

मॅकियाव्हेलीने धर्म व नीती यांचा राजकारणावर पडलेला वाईट प्रभाव अनुभवला होता. त्यामुळे त्याने फार काळजीपूर्वक राजकारणापासून धर्म आणि नैतिकता अलग केली. नैतिकतेला तो राज्याच्या आधार मानायला तयार नाही. शासकाने आपले उद्‌दिष्ट किंवा साध्य प्राप्त करण्यासाठी कोणत्याही नैतिक, अनैतिक साधनांचा उपयोग करावा असे मॅकियाव्हेली म्हणतो. त्याच्यामते राज्य हे साधन नसून साध्य आहे. राज्याचे हितसंबंध साकारण्यासाठी राज्याने केलेली कोणतेही कृती किंवा कार्य न्याय व नैतिक असते.

**मॅकियाव्हेलीने नैतिकतेचे दोन प्रकार मांडले आहेत**

१) व्यक्तिगत नैतिकता (Private Morality)

२) जन / लोक नैतिकता (Public Morality)

व्यक्तीगत नैतिकतेत तो राज्याच्या नैतिकतेचे मापदंड ठरवितो तर जन किंवा सामाजिक नैतिकतेत जनतेच्या नैतिकतेचे नियम ठरवितो. मॅकियाव्हेलीच्या मते, सामान्य जनतेने नैतिकतेचे पूर्ण पालन करावे कारण त्यातच जनतेचे कल्याण असते. राज्याच्या आदेशांचे, कायद्याचे पालन करणे, राष्ट्रासाठी बलिदान देणे व राज्याला सहकार्य करणे म्हणजेच नैतिकता होय अशा प्रकारची नैतिकता जनतेसाठी आवश्यक आहे पण राज्यकर्त्यांसाठी तो अशी नैतिकता आवश्यक मानत नाही. राजा हा

पूर्ण स्वतंत्र असून, तो नीतीनियमांच्या बंधनात अडकलेला नसतो, कारण त्याच्यासाठी नैतिक नियम नसतात. नैतिक नियम फक्त प्रजेसाठी असतात. राजाने आपली शक्ती / सामर्थ्य वाढविण्यासाठी व टिकविण्यासाठी कोणत्याही साधनांचा वापर करावा. कारण सर्वच साधने राजासाठी न्याय असतात. साध्य प्राप्त करणे हेच प्रमुख उद्दिष्ट असले पाहिजे. अत्याचार, हिंसा, धोकेबाजपणा राज्याच्या संरक्षणासाठी व दृढतेसाठी आवश्यक असतो. साध्य प्राप्त होत असेल तर कोणतेही साधन उचित ठरते. त्यामुळे राजाने साध्याचा विचार करावा साधनांचा नाही. मॅकियाव्हेलीच्या मते, राजाने फक्त राज्य सुरक्षित व दृढ कसे राहिल याची चिंता करावी. कारण नीती- अनीतीच्या कल्पना राजासाठी नाहीत. राज्याच्या संरक्षणासाठी वाटेल तो अन्याय अत्याचार करावा लागला, धोका द्यावा लागला तरी राजाने मात्रेपुढे पाहू नये. कारणे नैतिक-अनैतिक अशा कोणत्याही साधनाचा वापर करून राजाने आपला उद्‌देश साध्य करावा. मॅकियाव्हेलीच्या मते, चांगले-वाईट, धर्म-अधर्म, नैतिक-अनैतिक, इहलोक-परलोक हे विचार भित्र्या मनुष्यासाठी आहेत. राजासाठी नाहीत गरज भासल्यास राजाने कपट, धोका, बेईमानी, हत्या संधीसाधुपणा असे कोणतेही साधन वापरावे. कारण साध्यावरून साधनाची किंमत ठरते. मॅकियाव्हेलीच्या मते कायद्याची व नीतीची निर्मिती राजा करीत असेल, तर त्याचे बंधन राजावर असणार नाही. राजाला सार्वजनिक हित साधावयाचे असल्याने त्याच्यावर राज्याची मोठी जबाबदारी असते. त्यामुळे राजाची प्रत्येक कृती किंवा कार्य समर्थनीयच असते. राज्य हे मूळातच नैतिक किंवा अनैतिक नाही, तर ते नीतीकक्षेच्या बाहेर असते. नीती-अनीतीच्या कल्पना ह्या धर्माशी संबंधीत असतात. राजा सिंहाप्रमाणे शूर व कोल्हयाप्रमाणे धूर्त असावा वेळप्रसंगी राजा इतका कपटी व धूर्त असावा की, लोकांच्या डोळ्यात धूळ फेकून आपण कसे दया-प्रेम-श्रद्धा धार्मिकतेचे प्रतीक आहोत, असा त्याने भास निर्माण करावा.

मॅकियाव्हेतीने नैतिकतेबरोबरच धर्मालाही उच्च स्थान दिले नाही. राज्याच्या हितासाठी राजाने अनैतिक व अधार्मिक कार्याचा अंगीकार केला तरी चालेल. इतकेच नाही तर वेळ प्रसंगी धर्माचाही त्याग राज्यकर्ता करू शकतो. मॅकियाव्हेलीच्या या विचारांवरून तो अधार्मिक व अनैतिक आहे असा आक्षेप घेतला जातो. पण तो तसा नाही तर राजकारणात शिरलेल्या धर्म व नीतीच्या विरोधात तो आहे. त्याच्यामते राजा राज्याचा निर्माता असल्याने तो कायद्याच्या सीमेबाहेर असतो आणि नैतिकतेसंबंधी कायदे बनविले तर तो नैतिकतेच्या सीमेबाहेर असेल. मॅकियाव्हेली नास्तिक नव्हता पण राजकारणातील धर्म प्रभावाच्या विरोधी होता. मॅकियाव्हेलीच्या मते, जर एखादा राजा किंवा गणराज्य भ्रष्टाचारमुक्त राहू इच्छित असेल तर त्याने प्रथम धर्म संस्कारांना शुद्ध ठेवले पाहिजे. धर्माबद्‌दल उचित श्रद्धा असली पाहिजे. कारण धर्माची हानी म्हणजेच देशाच्या विनाशाचे लक्षण होय. मॅकियाव्हेली चर्च नष्ट करू इच्छित नव्हता, तर त्याद्‌वारे राज्याच्या नियमाबाबत जनतेला कर्तव्यशील बनवू इच्छित होता.

मॅकियाव्हेलीचे धर्म आणि नैतिकतेसंबंधीचे विचार लक्षात घेताना त्याने ते का मांडले? हे समजून घेणे आवश्यक ठरते.

१) मॅकियाव्हेली राज्याला मनुष्याच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक मानत होता. व्यक्तीचे कल्याण राज्यच करू शकते यावर त्याचा विश्वास होता. त्यामुळे राज्य सुरक्षित ठेवणे गरजेचे असल्याने तो राज्याच्या सुरक्षिततेसाठी कोणत्याही साधनाचा पुरस्कार करतो.

२) पोपद्वारे होत असलेल्या भ्रष्टाचाराने तो हैराण झाला होता. तर ज्या अंधविश्वासाने मनुष्य संकटांशी सामना करू शकत नाही. अशा मनुष्याला दुर्बल बनविणारी पोपची सत्ता कमी करण्याचा मॅकियाव्हेलीचा उद्‌देश होता.

३) मॅकियाव्हेलीला राज्याला महत्वाचे स्थान द्यावयाचे होते. यासाठी त्याचे सामर्थ्य वाढवणे आवश्यक होते म्हणून त्याने स्वर्गलोकातील लाभापेक्षा इहलोकातील लाभ महत्वाचा मानला व धर्म भक्तीपेक्षा देशभक्ती महत्वाची आहे, या विचाराने राजकारणापासून धर्म व नैतिकतेची फारकत केली.

४) प्रचलित दैवी सिद्धांत खोडून, राज्यही मानवनिर्मित संस्था आहे हे मॅकियाव्हेलीने स्पष्ट केले. मनुष्याच्या स्वार्थी व दुष्ट वृत्तीतून जी अराजकता निर्माण झाली, ती नष्ट करण्यासाठी राज्याची निर्मिती झाली असे त्याचे मत होते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न ३**

खालील प्रश्नांची उत्तरे एक-दोन वाक्यात लिहा.

१) मॅकियाव्हेलीने राजकारणाची कशापासून फारकत केली?

२) नैतिकतेचे प्रकार सांगा.

३) मॅकियाव्हेलीच्या मते राज्य कोणी निर्माण केले?

४) व्यक्तीचे कल्याण कोण करू शकते असे मॅकियाव्हेलीली वाटते?

५) मॅकियाव्हेलीने राज्याच्या निर्मिती संबंधीचा कोणता सिद्धांत खोडून काढला?

## ३.२.३ मॅकियाव्हेलीचे शासनाचे वर्गीकरण

मॅकियाव्हेलीने आदर्श राज्याच्या स्पष्टीकरणासाठी शासन संस्थेचे वर्गीकरण मांडले आहे. मॅकियाव्हेलीवर ग्रीक संस्कृतीतील राज्यविचारांचा प्रभाव असल्याने, आदर्श राज्याची सत्ता अमर्यादित असते असे तो मानतो. मॅकियाव्हेलीचे शासनाचे वर्गीकरण संख्यातत्वावर आधारित असून ॲरिस्टॉटलप्रमाणे त्याने शासनाचे शुद्ध व भ्रष्ट अशा दोन प्रकारात वर्णन केले आहे.

| **शुद्ध स्वरूप** | **भ्रष्टस्वरूप** |
|---|---|
| १) राजतंत्र | १) एकतंत्र |
| २) कुलीनतंत्र | २) धनिकतंत्र |
| ३) प्रजातंत्र | ३) लोकशाही |

वरील सहा प्रकारांशिवाय संमिश्र शासनाचा सातवा प्रकार त्याने सांगितला. संमिश्र शासनात वरील सर्व शासन प्रकारातील गुणांचा समावेश केला जातो त्यामुळे त्यात सत्ता संतुलन व नियंत्रण हे दोन्हीही गुण दिसून येतात. तरी देखील मॅकियाव्हेलीने दोन प्रकारच्या शासनाचेच विचारपूर्वक वर्णन केले आहे ते म्हणजे १) राजतंत्र २) प्रजातंत्र होय.

## १) राजतंत्र

कोणत्या देशात राजतंत्र सर्वश्रष्ठ ठरेल याचे विवेचन करताना मॅकियाव्हेलीने म्हणतो की, ज्या देशात स्वार्थ शिगेला पोहचला असेल, ज्या ठिकाणी व्यक्तीहिताकडे अधिक लक्ष असेल, चारित्र्य नसलेली प्रजा व जिकडेतिकडे भ्रष्टाचार असेल अशा देशात निरंकुश राजतंत्र पाहिजे. तत्कालीन इटलीचे भ्रष्टरूप नजरेसमोर असल्याने मॅकियाव्हेलीने निरंकुश राजतंत्राचे समर्थन केले. अशा राजतंत्राचे त्याने दोन प्रकार पाडले. अ) अनुवंशिक राजतंत्र ब) कृत्रिम राजतंत्र होय. यातील अनुवंशिक राजतंत्रातील राजाला कमीत-कमी समस्यांना तोंड द्यावे लागते. कारण पिढ्यान-पिढ्या तेच राजघराणे प्रजेवर राज्य करीत असते व प्रजा राजाशी एकनिष्ठ असल्याचे संकेत प्रस्थापित झालेले असतात. त्यामुळे परस्परांचा घनिष्ठ संबंध, विश्वास व आत्मीयता या गोष्टी गृहित धरता येतात. त्यामुळे अशा राजाला अधिमान्यता मिळविण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागत नाहीत.

याउलट कृत्रिम राजतंत्रातील राजाला अधिक समस्यांना तोंड द्यावे लागते. अशा राजाकडे प्रजा परकीय आक्रमण किंवा शत्रू अशाच नजरेने पाहत असते. कारण तो आक्रमण करून सत्तेवर आलेला असतो. अशा परिस्थितीत प्रजेची अधिमान्यता मिळविण्यासाठी प्रजा हिताची कार्य करून विश्वास संपादन करावा लागतो राजतंत्राचे समर्थन करताना राज्याच्या सुरक्षिततेसाठी न्याय-अन्याय, योग्य-अयोग्य वा नैतिक-अनैतिक याकडे लक्ष देऊ नये असे त्याने म्हटले आहे.

## २) प्रजातंत्र

मॅकियाव्हेलीने आपल्या 'डिस्कोर्सेस' या ग्रंथात प्रजातंत्राचे समर्थन केले असून, व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास करण्याची संधी व त्यासाठी अनुकूल परिस्थिती प्रजा किंवा गणतंत्रात मिळते म्हणून ते श्रेष्ठ आहे असे तो म्हणतो. ज्या समाजात पुरेशी समानता व प्रगल्भता असते तेथे प्रजातंत्र शासन यशस्वी होऊ शकते. याबरोबर संपत्तीच्या वितरणात समानता व जनतेत सार्वजनिक भावना जास्ती-जास्त असणे गरजेचे असते. प्रजातंत्रात राजकीयदृष्ट्या जनता सुशिक्षित व सहकार्याची भावना जोपासलेली असल्याने जनतेच्या मताप्रमाणे राज्यकारभार चालतो व शासनाला स्थैर्य मिळते. एका व्यक्तीचे निर्णय अधिक अचूक असण्याची शक्यता जास्त असते. प्रजातंत्रात मागील चूका दुरूस्त करून भविष्यात अधिक योग्य निर्णय घेतले जाण्याची शक्यता वाढते. राजकीय प्रक्रियेत लोकांचा सहभाग असल्याने शासनाचे स्थैर्य वाढतेच पण अन्य राज्याच्या मनात त्यांच्या विषयी विश्वासाची भावना अधिक बळकट होते. प्रजातंत्रात एखादे राजकीय परिवर्तन घडवताना संघर्ष, हिंसाचार करावा लागत नाही. कोणताही कडवटपणा येऊ न देता असा बदल घडवून आणता येतो. हे सर्व सत्य असले तरी तत्कालीन इटलीच्या परिस्थितीने प्रजातंत्राविषयीच्या मॅकियाव्हेलीच्या भावना पूर्णपणे दबल्या गेल्या व राजतंत्राविषयीच्या प्रभावी झाल्या असे म्हणता येईल.

याचा परिपाक म्हणून मॅकियाव्हेलीचा कुलीन तंत्राला कट्टर विरोध होता. कारण या कुलीनतंत्रानेच इटलीचे झालेले अधःपतन त्याने आपल्या डोळ्यांनी पाहिले होते. इटलीतील भ्रष्टाचाराला व विभाजनाला तो ह्या शासनालाच जबाबदार मानत होता. त्यामुळे इटलीची परिस्थिती पाहून व काळाची गरज ओळखून मॅकियाव्हेलीने राजतंत्राचे समर्थन केले आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न ४**

खालील प्रश्नांची उत्तरे एक-दोन वाक्यात लिहा.

१) मॅकियाव्हेलीने आदर्श राज्याच्या स्पष्टीकरणासाठी कशाचे वर्गीकरण केले आहे?

२) प्रजातंत्र श्रेष्ठ का असते?

३) राज्याच्या सुरक्षिततेसाठी राजाने कशाकडे लक्ष देऊ नये?

४) कोणत्या देशात निरंकूश राजतंत्र पाहिजे?

५) मॅकियाव्हेली सर्वात कट्टर विरोधक कोणत्या शासन पद्धतीचा होता?

## ३.२.४ मॅकियाव्हेलीने राजाला केलेला उपदेश

राज्यामध्ये शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी राजाने कशापद्धतीने वर्तन करावे, कोणत्या उपाय योजना कराव्यात. या गोष्टीचे विश्लेषण मॅकियाव्हेलीने आपल्या 'प्रिन्स' या ग्रंथात केले आहे. राजाला त्याच्या कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी उपदेश केलेला दिसून येतो. राज्याची उत्पत्ती कशी झाली हे सांगून ते टिकवावे, कसे ह्याचे विवेचन करताना राजाने पुढील तीन कर्तव्ये पार पाडवीत असे म्हणतो.

१) राज्याच्या संरक्षणाबरोबरच राज्यविस्तार वाढवावा.

२) दंडशक्ती व कायदा याद्वारे राजाने राज्यात शांतताः सुव्यवस्था निर्माण करावी.

३) राज्याचे हित लक्षात घेऊन प्रजेच्या कल्याणाची कार्ये करावीत.

वरील कर्तव्ये पार पाडण्यासाठी राजा जवळ सिंहाचे क्रौर्ये आणि कोल्ह्याचा धूर्तपणा असावा. कोणत्याही प्रकारची साधने वापरून राजाने आपला उद्देश साध्य करावा. राजेशाहीतील राजा हा कायद्याचा निर्माता असल्याने त्याचे स्थान कायद्यापेक्षा श्रेष्ठ असते. तसेच राजाने स्थान व्यक्तीगत नैतिकतेपेक्षा वरचे असते. राजा व राज्य हे कायदा आणि नैतिकता या संकल्पनेच्या कक्षेबाहेर असतात. अशाप्रकारे राजेशाहीतील राज्यकर्ता निरंकूश असला तरी त्यानी काही पथ्ये आवर्जून पाळली पाहिजेत त्याबाबत मॅकियाव्हेली राजाला उपदेश करतो. मॅकियाव्हेलीचा राजा निरंकुश असला तरी त्याची निरंकुशता जनतेच्या कल्याणासाठी आहे, स्वतःच्या स्वार्थासाठी नाही. यासाठी राजाला केलेला उपदेश पुढीलप्रमाणे

१) राजाकडे सिंहाचे क्रौर्य व कोल्ह्याचा धूर्तपणा असावा कारण राजाने कोणत्याही प्रकारची साधने वापरून उद्देश साध्य करावा, धूर्तपणा अभावी तो कटकारस्थाने हेरू शकणार नाही व क्रौर्याच्या अभावी शत्रूचे दमन करू शकणार नाही. या दोन्ही गुणांचा समन्वय राजा यशस्वी बनण्यासाठी अत्यावश्यक आहे.

२) राजाने प्रजेच्या संपत्तीला व स्त्रीच्या चारित्र्याला धक्का पोहचवू नये. कारण दोन गोष्टीत प्रजा संवेदनशील असते. अन्यथा जनक्षोभ होतो मनुष्य आपल्या मालकीच्या गोष्टीबाबत इतका दक्ष

असतो की, तो आपल्या पित्याच्या हत्याऱ्याला माफ करेल, पण वडीलार्जीत संपत्ती हिसकावून घेणाऱ्याला तो कधीही माफ करणार नाही.

३) समाजातील प्रचलित रुढी व परंपरांमध्ये राजाने हस्तक्षेप करू नये. काही अप्रिय कार्ये हाताखालील लोकांकडून करून घ्यावीत व दोष त्यांच्यावर ढकलावा, खापर त्यांच्या माथ्यावर फोडावे.

४) राजाने राज्याच्या हितासाठी नैतिक-अनैतिक, न्याय-अन्याय ह्याचा विचार करू नये. राजाने दयाळूपणाचा बुरखा पांघरून आपले क्रौर्य झाकावे. उत्तमप्रकारे बहुरूप्याचे सोंग वठवावे.

५) मॅकियाव्हेलीच्या मते मनुष्य दोन कारणांनी दुसऱ्याच्या आज्ञा पाळतो १) भीती व २) प्रेम पण राजाने प्रेमावर विश्वास ठेवू नये. कारण मनुष्य मुळातच स्वार्थी व धोकेबाज असल्याने राजाने जनतेला भीती दाखवूनच आज्ञांचे पालन करून घ्यावे. पण देखावा मात्र उदार अंतःकरणाचा, धार्मिकतेचा करावा.

६) राजाने लोकांच्या भावना भडकवून त्याचा उपयोग राज्यकारभारात करून घ्यावा. पण स्वतः मात्र भावनेच्या आहारी जाऊ नये.

७) राजाने राज्याच्या हितासाठी शेजारील राष्ट्राशी आवश्यक असे कोणतेही करार करावेत व कालांतराने गरज नसल्यास ते करार मोडावेत, त्यांचा प्रदेश हडप करण्यासही मागेपुढे पाहू नये.

८) राजाने सतत आक्रमण योजना तयार करून आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सत्ता संतुलन ठेवण्याचा प्रयत्न करावा. शेजारील दोन राज्यात करार होऊन ती आपल्यापेक्षा बलवान होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

९) राजाने जवळील राज्यात सतत हस्तक्षेप करीत रहावे. संधी मिळताच त्यांचा प्रदेश गिळंकृत करून आपली सीमा वाढवावी व नवीन भूमीवर अधिकार प्रस्थापित करावा.

१०) राजाने दृढनिश्चयी, संयमी व निर्णयक्षम अशी आपली प्रतिमा तयार केली पाहिजे राजाने आत्मस्तुतीला कधीही भाळू नये.

११) राजाने राज्याचे संरक्षण व विकास हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून नैतिक-अनैतिक, उचित-अनुचित अशा कोणत्याही साधनाचा वापर करावा.

१२) युद्ध हे अनेकदा गरजेचे वा उपयुक्तही असते. युद्धात आपल्याला विजयाची खात्री असल्यास राजाने युद्ध टाळू नये. पण तेही स्वबळावर लढावे. एखाद्या बलाढ्य सत्तेचा पाठिंबा घेऊन दुसऱ्यावर हल्ला करू नये. कारण आपल्यापेक्षा सामर्थ्यवान राज्य आपल्याला केव्हाही गिळंकृत करण्याचा धोका असतो.

१३) राजाला आपल्या सद्गुणांचे व दुर्गुणांचेही चांगले भांडवल करता आले पाहिजे. आपले दुर्गुणही राज्याच्या हितासाठभ कसे आवश्यक आहेत हे प्रजेला पटवून देता आले पाहिजे.

१४) राजाने कृषी, वाणिज्य, संगीत, कला, साहित्य याक्षेत्रातील व्यक्तींना राजाश्रय द्यावा. कारण जनमाणसात त्यांचे आदराचे स्थान असते. त्यांच्याकडून राजाला मिळालेली पसंती राजाचे स्थान आणखी बळकट करते.

१५) राजाने केलेली अलौकिक कामगिरी कोणत्या-ना-कोणत्या मार्गांनी सतत लोकांच्या नजरेत राहील असे पहावे.

१६) राजाने साम्राज्य विस्ताराचे धोरण स्वीकारावे. त्यासाठी साम, दाम, दंड, भेद या नीतीचा अवलंब करून आपले शक्तीप्रदर्शन करावे.

अशाप्रकारे मॅकियाव्हेलीने राजाला केलेला उपदेश हा राजाला अधिक संपन्न, सामर्थ्यवान व शक्तीशाली बनविण्यासाठी केला असून त्यातून मॅकियाव्हेली निरंकूश राजा तयार करू इच्छितो. पण ही निरंकुशता जनकल्याणासाठी व राज्याच्या सुरक्षिततेसाठी असल्याने दिसून येते. त्यात स्वतःचा स्वार्थनाही. त्यामुळे या विचारांचे महत्व कायम आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न ५**

१) राजाकडे कोणते गुण असावेत?

२) राजाने कोणत्या गोष्टींना धक्का पोहचवू नये?

३) मनुष्य कोणत्या दोन कारणांनी दुसऱ्याच्या आज्ञा पाळतो?

४) मॅकियाव्हेलीने राजाला उपदेश कशासाठी केला?

## ३.२.५ मॅकियाव्हेली आधुनिक राजकीय विचारांचा जनक

आधुनिक राजकीय विचारांचा जनक असे मॅकियाव्हेलीला म्हटले जाते कारण मॅकियाव्हेलीने मध्ययुगातील रुढी, परंपरांचे खंडन करून आधुनिक व्यवहारवादी युगाचा पाया घातला. याबरोबरच त्याने मध्ययुगातील प्रचलित विचारांचा शेवट केला. आधुनिक राजकीय विचारांची मांडणी करताना त्यांनी महत्वाच्याबाबींचा पुरस्कार केला. शास्त्रीय अभ्यास पद्धतींचा वापर केला व राजकारणापासून विकृत धर्माला दूर केले.

### १) मनुष्यनिर्मित काद्याला मान्यता

मॅकियाव्हेलीने मनुष्यनिर्मित कायद्याचे अस्तित्व मान्य करून, दैवी कायदा नाकारला. मध्य युगात दैवी कायद्याना महत्वाचे स्थान होते व पाप-पुण्य, इहलोक-परलोक या कल्पनांवर ते आधारित होते. धर्म राजापेक्षा श्रेष्ठ होता. मॅकियाव्हेलीने राज्यनिर्मित कायद्याचे श्रेष्ठत्व मान्य करताना कायद्याची निर्मिती देवाने नाहीतर राजाने केली आहे. स्वर्गप्राप्ती हा त्याचा हेतू नसून, राज्यात राजाने केली आहे. स्वर्गप्राप्ती हा त्याचा हेतू नसून, राज्यात शांतता व सुव्यवस्था टिकवणे हा आहे असे स्पष्टीकरण केले.

### २) सर्वश्रेष्ठ राज्यसंस्था

मध्ययुगात ईश्वराचा प्रतिनिधी म्हणून पोचला श्रेष्ठ समजण्यात येत होते. पण इटलीतील चर्चचे धर्मगुरू भ्रष्ट, चारित्र्यहिन व निरंकुश बनले चर्चमुळे अनैतिकता मोठ्या प्रमाणात वाढली अशी मॅकियाव्हेलीची पक्की धारणा होती.

यातून बाहेर पडण्यासाठी त्याने राज्यसंस्थेला सर्वश्रेष्ठ स्थान दिले समाजातील इतर सर्वसंस्थांना गौण स्थान देऊन, त्या सर्व आपल्या कार्याबाबत राजाला जबाबदार राहतील असे स्पष्ट केले. पोपचे महत्व नष्ट करून धर्मसंस्था ही राज्यसंस्थेच्या आधीन करण्याचे काम मॅकियाव्हेलीने केले.

### ३) राष्ट्र–राज्याच्या कल्पनेचा पुरस्कर्ता

राष्ट्र–राज्य हे सर्वोच्च किंवा अंतिम राज्य आहे, असे मॅकियाव्हेलीने मत होते राष्ट्र–राज्याचा पुरस्कार करणारा तो पहिला विचारवंत होता. राज्यात एकात्मता निर्माण करण्यासाठी समान रुढी, परंपरा, भाषा, धर्म व कायदे असावेत असे त्याचे मत होते. राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणाऱ्या घटकांची त्याला जाणीव होती. त्यानेच राष्ट्र–राज्याच्या कल्पनेचा प्रथम पुरस्कार केला.

### ४) राज्याच्या शक्ती सामर्थ्यावर विश्वास

जनतेने राजाच्या आज्ञेचे पालन करावे. यासाठी व राज्य टिकविण्यासाठी शक्तीचा वापर करावा असे मॅकियाव्हेलीचे मत होते. शक्तीच्या वापराशिवाय राज्यात सुव्यवस्था राहू शकत नाही असे त्याचे मत होते. आधुनिक काळात जगातील सर्वच राष्ट्रे शक्तिसामर्थ्य वाढविण्यात गुंतलेली दिसतात.

### ५) व्यक्तिवादाचे बीजारोपण

राज्याला सर्वोच्च स्थान दिले असेल तरी शासकाने व्यक्तीच्या संपत्तीचे व जीवितोचे सरंक्षण करावे असे त्याने म्हटले आहे. व्यक्तीगत बाबीचे अपहरण हा मोठा अपराध मानून, व्यक्तीची संपत्ती हडप करण्याचा अधिकार तो राजाला देत नाही. अशाप्रकारे व्यक्तीवादाचे समर्थन मॅकियाव्हेलीने केले.

### ६) ऐतिहासिक पद्धतीने विश्लेषण

धार्मिक दृष्टांतावरून सिद्धांताचे स्पष्टीकरण करणे अयोग्य व अव्यावहारिक आहे असे स्पष्ट करून मॅकियाव्हेलीने आपल्या सिद्धांताच्या स्पष्टीकरणासाठी ऐतिहासिक दाखले दिले आहेत. ही बाब पूर्णपणे दोषरहित नसली तरी पुढील विचारवंतांना एक नवी दिशा देते.

### ७) राजकारणापासून धर्म आणि नीतीची फारकत

राजाने धर्म व नीतीचा विचार न करता राज्य कायम स्वरूपी टिकविण्यासाठी कोणत्याही नैतिक–अनैतिक, योग्य–अयोग्य, साधनांचा वापर केला तरी तो न्यायच ठरेल असे मत मांडले. साधनांची नैतिकता त्याच्या साध्यावरून ठरवून मॅकियाव्हेलीने राज्याला धर्म आणि नैतिकतेच्या बंधनातून इतिहासात प्रथमच मुक्त केले.

### ८) मनुष्यनिर्मित राज्य

इतिहासातील प्रचलित सर्व सिद्धांत खोडून काढत राज्य ही दैवी संस्था नसून मनुष्यनिर्मित आहे असा विचार मॅकियाव्हेलीने मांडला. समाजात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी राज्याची निर्मिती झाली आहे स्वर्गप्राप्तीसाठी नाही असे मत त्याने मांडले.

### ९) व्यावहारिक दृष्टीकोन

मॅकियाव्हेली आपले विश्लेषण करताना व्यावहारिकतेवर भर देतो. धर्म, नीतीच्या काल्पनिक व आध्यात्मिक साधनांवर विश्वास न ठेवता तो साध्य गाठण्याला महत्व देतो.

मॅकियाव्हेलीचे वरील सर्व विचार लक्षात घेऊन त्याला आधुनिक राजकीय विचारांचा जनक असे संबोधले जाते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न ६**

खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

१) मॅकियाव्हेलीने कोणत्या कायद्याला मान्यता दिली?

२) कोणत्या संस्थेला मॅकियाव्हेलीने सर्वोच्च स्थान दिले?

३) आधुनिक राजकीय विचारांचा जनक असे कोणास म्हणतात?

४) मॅकियाव्हेलीने कशाचे बीजारोपण केले?

## ३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१) धर्मसुधारणा चळवळ – पोप व चर्च यांच्या भ्रष्ट व अनियंत्रीत सत्ते विरूद्धची चळवळ

२) पुनरूज्जीवन – ग्रीक विचारांची पुनर्मांडणी

३) इहलोक – जगाच्या संदर्भात व जगासंबंधी मानवाचा केलेला विचार

४) जीविताची – जीवनाची / आयुष्याची

५) दंडशक्ती – नियमभंगाबाबत शिक्षा देणारी सत्ता

६) फारकत – वेगवेगळे करणे

७) नास्तिक – ईश्वर न मानणारा

८) राजतंत्र – राजेशाही

९) प्रजातंत्र – लोकांचे राज्य

१०) उपदेश – सल्ला देणे

११) धूर्तपणा – चाणाक्षपणा

१२) गिळंकृत करणे – नाश करणे, आपल्यात सामावून घेणे

१३) निरकूंश – ज्याच्यावर कोणाचेही नियंत्रण नाही असा

१४) राष्ट्र  – एकतेची भावना जपणारा समूह

## ३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### स्वंय अध्ययन प्रश्न १

१) मॅकियाव्हेलीचा जन्म इटलीतील फ्लॉरेन्स या ठिकाणी १४६९ साली झाला.

२) १) दि प्रिन्स  २) डिस्कोर्सेस ऑफ लिव्ही

३) मॅकियाव्हेलीने अध्ययनासाठी ऐतिहासिक, निरिक्षणात्मक, वास्तववादी शास्त्रीय व तौलनिक पद्धतीचा वापर केला.

४) मॅकियाव्हेलीचे निधन २० जून १५२७ मध्ये झाले.

### स्वयं अध्ययन प्रश्न २

१) मॅकियाव्हेलीच्यामते मनुष्य निसर्गतः स्वार्थी व दुष्ट प्रवृत्तीचा असतो.

२) मनुष्याला आपल्या जीविताच्या व संपत्तीच्या संरक्षणाची सर्वात जास्त भीती वाटते.

३) राजाने प्रजेवर दंडशक्तीच्या भीतीने राज्य करावे.

### स्वयं अध्ययन प्रश्न ३

१) मॅकियाव्हेलीने राजकारणाची धर्म व नैतिकतेपासून फारकत केली.

२) नैतिकतेचे दोन प्रकार १) व्यक्तिगत नैतिकता आणि २) जन किंवा लोकनैतिकता होय.

३) मॅकियाव्हेलीच्या मते राज्य मानवाने निर्माण केले.

४) व्यक्तीचे कल्याण राज्यच करू शकते असे मॅकियाव्हेलीला वाटते.

५) मॅकियाव्हेलीने राज्याच्या निर्मिती संबंधीचा दैवी सिद्धांत खोडून काढला.

### स्वयं अध्ययन प्रश्न ४

१) मॅकियाव्हेलीने आदर्श राज्याच्या स्पष्टीकरणासाठी शासनसंस्थेचे वर्गीकरण केले आहे.

२) प्रजातंत्रात व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्वाचा सर्वागीण विकास करण्याची संधी व त्यासाठी अनुकूल परिस्थिती मिळते म्हणून ते श्रेष्ठ असते.

३) राज्याच्या सुरक्षिततेसाठी राजाने न्याय अन्याय, योग्य-अयोग्य वा नैतिक-अनैतिक अशा कोणत्याच गोष्टीकडे लक्ष देऊ नये.

४) ज्या देशात स्वार्थ शिगेला पोहचला असेल, व्यक्ती हिताकडे जास्त लक्ष असेल, चारित्र्यहीन प्रजा व भ्रष्टाचार असेल अशा देशात निरंकुश राजतंत्र पाहिजे.

५) मॅकियाव्हेली सर्वात कट्टर विरोधक कुलीन तंत्र या शासन पद्धतीचा होता.

**स्वयं अध्ययन प्रश्न ५**

१) राजाकडे सिंहाचे क्रौर्य व कोल्ह्याचा धूर्तपणा हे गुण असावेत.

२) राजाने प्रजेच्या संपत्तीला व स्त्रीच्या स्त्रीत्वाला/ चारित्र्याला धक्का पोहचवू नये.

३) मनुष्य १) भिती २) भिती या दोन कारणांनी दुसऱ्याच्या आज्ञा पाळतो.

४) मॅकियाव्हेलीने राजाला अधिक संपन्न, सामर्थ्यवान व शक्तीशाली बनविण्यासाठी उपदेश केला.

**स्वयं अध्ययन प्रश्न ६**

१) मॅकियाव्हेलीने दैवी कायदा नाकारून मनुष्यनिर्मित कायद्याला मान्यता दिली.

२) मॅकियाव्हेलीने सर्वात श्रेष्ठ स्थान राज्यसंस्थेला दिले.

३) आधुनिक राजकीय विचारांचा जनक असे मॅकियाव्हेलीस म्हणतात.

४) मॅकियाव्हेलीने व्यक्तिवादाचे बीजारोपण केले.

## ३.५ सारांश

मॅकियाव्हेलीने निरीक्षणात्मक, शास्त्रीय व वास्तवादी अध्ययन पद्धतीने आपले राजकीय विचार स्थिर करताना, पारंपरिक अध्ययनातील अतिधार्मिकता नाकारली. धार्मिकतेतून राजकीय तत्वज्ञानास मुक्त करताना जे प्रत्यक्ष अनुभवता येते, अशाच आधारांवर निष्कर्ष काढण्याची पद्धती वापरली. इटलीची तत्कालीन परिस्थिती पाहूनच मनुष्य स्वभावतःच स्वार्थी व दुष्ट असतो अशा निष्कर्षापर्यंत तो पोहचला पण अशा मनुष्यास स्वतःच्या जीविताच्या व संपत्तीच्या संरक्षणासाठी राज्यसंस्थेची आवश्यकता निर्माण झाली. या गरजेतून राज्यसंस्थेची निर्मिती झाली, हे प्रतिपादन करताना त्यासंबंधीचा दैवी सिद्धांत मॅकियाव्हेली खोडून काढतो.

राजकारणाची धर्म आणि नैतिकतेपासून फारकत करून मॅकियाव्हेली आधुनिक विचारवंताच्या पंक्तीत येतो. नैतिकतेला व धार्मिकतेला तो राज्याचा आधार मानायला तयार नाही. राज्याच्या हितासाठी राजाला अनैतिक व अधार्मिक कार्य करण्याची तो मुभा देतो. राजा कायद्याचा निर्माता असल्याने तो कायद्याच्या सीमेबाहेर असतो आणि नैतिकतेसंबंधी कायेदबनवले तर तो नैतिकतेच्या सीमेबाहेर असतो. असे स्पष्ट करून, मॅकियाव्हेली निरंकुश राजाचे समर्थन राज्यसंस्थेच्या सुरक्षिततेसाठी करताना दिसतो. राज्यसंस्था स्थिर होण्यासाठी राजाने कशाप्रकारे वर्तन करावे याविषयी मॅकियाव्हेली राजाला उपदेश करतो. त्याच्यामते राजाने नैतिक-अनैतिक, न्याय-अन्याय, योग्य-अयोग्य अशा कोणत्याही साधनांचा वापर करून राज्याचे संरक्षण व सामर्थ्य यामध्ये वाढ करावी.

राज्यसंस्था मानव निर्मित आहे त्याने हे स्पष्ट केले. मनुष्य निर्मित कायद्यांना मान्यता व दैवी कायद्यांना नाकारणारा मॅकियाव्हेली आधुनिक युगातील पहिला विचारवंत आहे. राज्यसंस्थेला सर्वश्रेष्ठ स्थान देतानाच व्यक्तीवादाचे समर्थन मॅकियाव्हेली करतो. राज्याच्या शक्ती सामर्थ्यावर विश्वास ठेवून अंतिम राज्य म्हणजे राष्ट्र-राज्य होय अशी संकल्पना मांडणारा तो पहिला विचारवंत आहे. अशा प्रकारे आधुनिक राज्यशास्त्राला पोषक ठरणाऱ्या अनेक संकल्पनांची मांडणी सर्वप्रथम मॅकियाव्हेलीने केली म्हणून त्याला आधुनिक राजकीय विचारांचा जनक असे संबोधले जाते.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा.**

१) मॅकियाव्हेलीच्या मनुष्यस्वभावासंबंधी विचारांचे विश्लेषण करा.

२) आधुनिक राजकीय विचारांचा जनक म्हणून मॅकियाव्हेलीचे योगदान विषद करा.

३) मॅकियाव्हेलीचे शासनाचे वर्गीकरण स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१) राजकारणाची धर्म व नैतिकतेपासून फारकत व मॅकियाव्हेली.

२) मॅकियाव्हेलीने राजाला केलेला उपदेश.

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१) काणे प. सि. - काही प्रमुख राज्यशास्त्रज्ञ

२) गर्दे दि. का - पाश्चात्य राजकीय विचारप्रवाह

३) शृंगारपुरे अरविंद - पाश्चिमात्य राजकीय विचारक

४) नांदडेकर व. गो. - राजकीय विचार आणि विचारवंत

५) देवरे पी. डी., निकुंभ डी. एस. - पाश्चिमात्य राजकीय विचारवंत

६) पाटील बी.बी. - पाश्चात्य राजकीय विचार


❑❑❑